**<u>प्रेसनोट दि.०६/०३/२०१९</u>**

**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**

**<u>पोलीसांच्या पत्परतेने प्रवासामध्ये बदली झालेली महत्वाचे कागदपत्र असलेली बॅग विद्यार्थ्यास मिळाली परत</u>**

दि.०२/०३/२०१९ रोजी मुलगा नामे स्वप्नील विभुते, रा. केशवनगर, मुंढवा, पुणे हे मुंढवा पोलीस ठाणे येथे येवून त्यांनी त्यांचेकडे असलेली बॅग पो.हवा. ५३१६ जगताप यांचेकडे देवून सदरची बॅग ही ते पाटोदा – पुणे असा एस.टी. बसणे प्रवास करीत असताना बदली झाली झाली असल्याचे सांगितले. पो.हवा. जगताप यांनी पोशि १३४४ सोनवणे व पोशि ८५९५ चौधरी यांचे मदतीने सदर बॅगची तपासणी केली असता त्यामध्ये कृष्णाराव लोंदे, रा. खानापुर, पळशी, जि. सांगली यांचे महाविद्यालयीन दाखला व इतर महत्वाचे ओरीजिनील कागदपत्र असल्याचे व ते संपतराव माने महाविद्यालय, खानापूर, सांगली येथे शिक्षण घेत असल्याचे समजून आल्याने पो.शि. सोनवणे यांनी तात्काळ शिवाजीनगर एस.टी. डेपो येथे फोन करुन पाटोदा- पुणे एस.टी.बाबत माहिती घेतली असता सदर एस.टी. गेल्याचे सांगितल्याने नमूद कर्मचारी यांनी इसम नामे कृष्णाराव लोंदे महाविद्यालयाचा संपर्क क्रमांक मिळवून श्री. कृष्णाराव लोंदे यांचे नातेवाईकांची माहिती मिळवून व त्याव्दारे सदर विद्यार्थ्यास संपर्क करुन व ते पुणे येथेच असल्याने त्यांना पोलीस ठाणे येथे बोलावून बदली झालेली बॅग त्यांना परत केल्याने व त्यामधील शिक्षणाचे महत्वाचे कागदपत्र सुखरुप परत मिळाल्याने दोघांनी पोलीसांची कृतज्ञता व्यक्त करुन आभार मानले.

तरी नमूद पोलीस कर्मचारी यांनी केलेल्या चागल्या कामगिरीबद्दल दैनिक वर्तमानत्रामध्ये प्रसिध्दी देण्यास विनंती आहे.

**दि.०६/०३/२०१९**

**(संपत डी.भोसले)**
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**मुंढवा पोलीस स्टेशन पुणे शहर**


१
जो कायद्याचा मान राखतो त्याचा आम्ही सन्मान करतो.
TEAM LONDON
MISBHV
70